# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:03.03.2025** **वार:सोमवार**

1. राज्य विधीमंडळाचं अर्थसंकल्पीय अधिवेशन आजपासून मुंबईत,
2. सर्व मुद्दयावर चर्चा करण्याची तयारी असल्याची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ग्वाही
3. सरकारनं आयोजित केलेल्या चहापानावर विरोधकांचा बहिष्कार
4. राज्यात यंदाच्या रब्बी हंगामात उच्चांकी पेरण्या
5. विदर्भाच्या संघानं तिसऱ्यांदा कोरलं रणजी करंडकावर नाव आणि
6. चॅम्पियन्स करंडक क्रिकेट स्पर्धेत भारताचा न्यूझीलंडवर 44 धावांनी विजय

**अधिवेशन**

राज्य विधिमंडळाचं अर्थसंकल्पीय अधिवेशन आजपासून सुरू होत आहे. राज्याचा आगामी वर्षाचा अर्थसंकल्प 10 मार्च रोजी सादर होणार आहे. या अधिवेशनात विरोधी पक्ष सरकारला कायदा आणि सुव्यवस्थेच्या मुद्दयावरून घेरण्याची शक्यता आहे. अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी एकत्रितपणे पत्रकार परिषद घेतली; या अधिवेशनात अतिशय संतुलित अर्थसंकल्प मांडण्याचा आमचा संकल्प असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. तत्पूर्वी विरोधी पक्षांच्या नेत्यांनीही संयुक्त पत्रकार परिषद घेत आपली भूमिका स्पष्ट केली. परभणीतल्या कार्यकर्त्याचं कोठडीत मृत्यू प्रकरण, बीडमधली सरपंचाची हत्या आणि पुण्यातील स्वारगेट बसस्थानक अत्याचार प्रकरणावरून विरोधक सरकारला लक्ष्य करण्याची शक्यता आहे. ऐकुया याबाबत अधिक वृत्तांत आमच्या प्रतिनिधिकडून......

**राज्य विधिमंडळाचं अर्थसंकल्पीय अधिवेशन आजपासून मुंबईत विधान भवनात सुरू होत आहे. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या अभिभाषणानं अधिवेशनाला सुरुवात होईल. राज्याचा आगामी वर्षाचा अर्थसंकल्प 10 मार्च रोजी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात मांडण्यात येईल. अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला काल सह्याद्री अतिथिगृहात चहापानाचा कार्यक्रम झाला; यावर विरोधक पक्षांनी बहिष्कार टाकला. सरकार विरोधकांना सापत्न वागणूक देत असून हे सरकार शेतकरी आणि युवकांच्या विरोधात आहे अशी टीका विधान परिषदेतले विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केली.....**

***फक्त चहापानाला जाणं, म्हणजे संवाद होणं अशातला काही भाग नाही. खरंतर संसदीय लोकशाहीचं पालन जशी सत्ताधारी पक्षानं करणं जबाबदारी आहे, तशीच विरोधी पक्षाची पण आहे. आणि या राज्याचं हीतव्हावं ही अपेक्षा जशी सत्ताधारी पक्षाची असेल तशी आमची सुद्धा तेवढीच आहे. विरोधी पक्षाला सातत्यानं सापत्नतेची भूमिका सत्ताधारी पक्ष घेत असतो. मग विकासाचे प्रश्न असतील, अन्य प्रश्न असतील, विरोधी पक्षाच्या सूचना असतील आणि याला कुठेही गृहीत धरलं जात नाही म्हणून आज आम्ही या चहापानावर बहिष्कार घालण्याचा निर्णय घेतलेला आहे.***

**तर अधिवेशनात सर्व प्रश्नांवर चर्चा करण्याची सरकारची तयारी असून विरोधकांना बोलण्याची संधी दिली जाईल असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वार्ताहरांशी बोलताना स्पष्ट केलं.....**

***अतिशय चांगलं, अतिशय बॅलन्स बजेट हे या ठिकाणी आम्ही मांडू. जरीही वेगवेगळ्या योजनांचा स्ट्रेस हा आमच्या बजेटवर असला तरीही आर्थिक शिस्त पाळण्याचा प्रयत्न आम्ही त्यातही केलेला आहे. आपली साधन-संपत्ती कशी वाढवता येईल, कुठल्याही परिस्थितीमध्ये कॅपिटल एक्सपेंडिचरवर त्याचा परिणाम होणार नाही, कॅपिटल एक्सपेंडिचरकरता काय वेगवेगळ्या पद्धती असू शकतील, अशा सगळ्या गोष्टींचा विचार करून एक बॅलन्स बजेट देण्याचा प्रयत्न या ठिकाणी आम्ही करतो आहोत. आणि आमच्या फ्लॅगशिप स्किम कुठल्याच आम्ही त्या ठिकाणी लाडकी बहीण बंद होणार असं काहीही नाही.***

**या अधिवेशनात विरोधकांना लोकांच्या प्रश्नांवर एकजूट दाखवण्याची संधी आहे. सत्ताधारी याला कसं सामोरं जातात हे पाहणंही महत्त्वाचं आहे. तसंच महाविकास आघाडीला विरोधी पक्षनेतेपद मिळणार की नाही हेही या अधिवेशनात ठरणार आहे. आकाशवाणी बातम्यांसाठी कौस्तुभ पटाईत, मुंबई.**

**<u>मुख्यमंत्री- परिवहन</u>**

राज्यातल्या महामार्गांवर अपघातांचं प्रमाण कमी झाल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल समाधान व्यक्त केलं. मुंबईत वरळी इथं परिवहन आयुक्त कार्यालयाच्या नियोजित 'परिवहन भवन' इमारतीचं भूमिपूजन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. महामार्गांवर स्वयंचलित वाहतुक नियंत्रण यंत्रणा कार्यरत असून, अपघात कमी होण्यात या यंत्रणेचा मोठा वाटा असल्याचं फडणवीस म्हणाले. या कार्यक्रमाला यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, परिवहन राज्यमंत्री माधुरी मिसाळ, यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते धर्मवीर आनंद दिघे महाराष्ट्र ऑटो रिक्षा आणि मीटर टॅक्सी कल्याणकारी मंडळातर्फे, 65 वर्षांवरील ऑटो रिक्षा आणि मीटर टॅक्सी परवाना धारकांना 'निवृत्ती सन्मान' योजनेंतर्गत प्रातिनिधीक स्वरुपात सन्मान निधीचं वितरण करण्यात आलं.

**<u>मुख्यमंत्री- रायगड</u>**

राज्य सरकारने न्यायिक पायाभूत सुविधांसाठी सातत्याने दरवर्षी सुमारे 1 हजार कोटींच्या निधीची तरतूद केलेली आहे. तसच उच्च न्यायालयाच्या समितीकडून प्राप्त प्रस्तावाची तातडीने पूर्तता करून कामे मार्गी लावली आहेत, त्यामुळे राज्यात अधिक गतीने न्यायदानाला चालना मिळेल असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. रायगड जिल्ह्यातील महाड इथल्या कनिष्ठ स्तर दिवाणी न्यायाधीश न्यायालयाच्या नूतन इमारतीचं भूमिपूजन आणि कोनशिला समारंभ सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती भूषण गवई, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री, एकनाथ शिंदे यांच्या हस्ते काल करण्यात आल, त्यावेळी आयोजित मुख्य सोहळ्यात ते बोलत होते. देशातील तीन नवीन गुन्हेगारी कायद्यांमुळे गुन्हे तपास, न्यायदान, न्यायवैद्यक प्रक्रिया अधिक प्रभावी होणार आहे, असं फडणवीस यावेळी म्हणाले.

**<u>रब्बी हंगाम</u>**

राज्यातील रब्बी हंगामातील पिकांच्या पेरण्याखालील सरासरी क्षेत्र 53 लाख 97 हजार हेक्टर इतके आहे. तर कृषी विभागाच्या पीक पेरणीच्या अंतिम अहवालानुसार यंदाच्या रब्बी हंगामात उच्चांकी म्हणजे 64 लाख 83 हजार हेक्टरवर पेरण्या पूर्ण झाल्या आहेत......

**राज्यात पाण्याची उपलब्धता अधिक असल्यामुळे पेरणी क्षेत्र वाढण्यास मदत झाल्याचे पुणे कृषी आयुक्तालयाकडून सांगण्यात आले. यामध्ये हरभरा पिकाखालील सरासरी क्षेत्र 21 लाख 52 हजार हेक्टरहून वाढून 29 लाख हेक्टरवर पोहोचले आहे. तसेच गहू आणि मक्याच्या पेरणी क्षेत्रातही भरीव वाढ झाली आहे. तर सरासरी 17 लाख 53 हजार हेक्टरइतके क्षेत्र असताना ज्वारीच्या पेरण्या मात्र 15 लाख 46 हजार हेक्टरवर पूर्ण झाल्या आहेत. रब्बीत पेरणी झालेल्या 64 लाख 83 हजार हेक्टर पैकी 29 लाख हेक्टर म्हणजे 45 टक्के वाटा हरभरा पिकाचा आहे. यंदा ऊसाचे क्षेत्र कमी असल्यामुळे रब्बी पिकांच्या पेरण्यांखालील क्षेत्रात वाढ होण्यास मदत झाली. त्यामुळे यंदा**

**उत्पादनातही निश्चित वाढ अपेक्षित आहे. असे पुणे कृषी आयुक्तालयाचे मुख्य सांख्यिक वैभव तांबे यांनी सांगितले. आकाशवाणी बातम्यासाठी पुण्याहून भूषण राजगुरू.**

**आशिष शेलार**

लोककलांमध्ये नाटकाची मुळं असल्याचं लेखन समोर येत असून अशा प्रकारचं संशोधन करण्यासाठी एखादा अभ्यास गट नाट्य परिषदेनं स्थापन करावा, सरकार या कामी पूर्ण मदत करेल, असं आश्वासन सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी दिलं. अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या 100व्या नाट्यसंमेलनानिमित्त नाट्य परिषदेतर्फे आयोजित विशेष नाट्यमहोत्सवाचा सांगता सोहळा काल मुंबईत भायखळा इथल्या लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नाट्यगृहात झाला, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी नाट्य जागरमधील विजेत्या 3 विशेष एकांकिकांचं सादरीकरण करण्यात आलं.

**पाणी टंचाई-धाराशिव**

धाराशिव जिल्ह्यातील संभाव्य पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर, तुळजापूर तालुक्यातील चार लघुपाटबंधारे प्रकल्पातील पाणी पिण्यासाठी आरक्षित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांनी हा आदेश जारी केला आहे.

**रणजी-मुंबई**

रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेमध्ये विदर्भ क्रिकेट संघानं विजय मिळवला आहे. विदर्भ आणि केरळ संघांमध्ये नागपूरमध्ये झालेला अंतिम सामना अनिर्णित राहिला; मात्र विदर्भानं पहिल्या डावात केरळवर मिळवलेल्या 37 धावांच्या आघाडीच्या जोरावर जेतेपदाला गवसणी घातली. सामन्याच्या कालच्या अखेरच्या दिवशी विदर्भाच्या दुसऱ्या डावात 9 बाद 375 धावा झाल्या असताना, दोन्ही संघांनी सामना अनिर्णित राखण्यावर सहमती दर्शवली. या सामन्यात पहिल्या डावात 153, आणि दुसऱ्या डावात 73 धावांची खेळी केलेल्या विदर्भच्या दानीश मालेवार सामनावीर ठरला. विदर्भाच्याच हर्ष दुबे याला त्याच्या अष्टपैलू कामगिरीसाठी स्पर्धेतल्या सर्वोकृष्ट खेळाडुच्या किताबानं गौरवलं गेलं. या संपूर्ण स्पर्धेत विदर्भाचा संघ अजिंक्य राहिला. त्यांनी 10 पैकी 9 सामने जिंकले तर केवळ अंतिम सामना अनिर्णित राहिला. रणजी स्पर्धेचं जेतेपद पटकावल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी विदर्भाच्या संघाचं अभिनंदन केलं आहे.

**क्रिकेट**

आय सी सी च्या चॅम्पियन्स करंडक क्रिकेट स्पर्धेत भारताने काल दुबई इथं झालेल्या सामन्यात न्यूझीलंडचा 44 धावांनी पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना श्रेयस अय्यरने 79 धावांसह अक्षर पटेल सोबत केलेल्या 98 धावांच्या भागीदारीच्या जोरावर भारताने 249 धावा केल्या. प्रत्युत्तरादाखल न्यूझीलंड संघाला 205 धावा करता आल्या. किवी संघाकडून केन विल्यमसनने सर्वाधिक 81 धावा केल्या. वरुण चक्रवर्तीने 42 धावात 5 गडी बाद केले तर कुलदीप यादवने 2 गडी बाद केले. उपांत्यफेरीत भारताचा उद्या ऑस्ट्रेलियाविरुद्ध दुबई इथं सामना होणार आहे. तर उपांत्यफेरीतील दुसरा सामना दक्षिण आफ्रिका आणि न्यूझीलंड संघात 5 मार्च रोजी होणार आहे.

**हवामान**

कोकणात तुरळक ठिकाणी हवामान उष्ण आणि दमट राहाण्याची शक्यता असून उर्वरीत राज्यात हवामान कोरडं राहाण्याची शक्यता वेधशाळेनं वर्तवली आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.